गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २७३ वा ● शुक्रवार २३ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 273 | Date : 23/02/2024 blow :Friday Page 4 Price 4

माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांचे निधन

मनोहर जोशी यांना शिवसैनिकांनी लक्ष्य केले होते.शुक्रवारी दुपारी नंतर दादर स्मशान भूमीत मनोहर जोशी यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

मुंबई : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांचे मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात हृदयविकाराच्या धक्क्याने आज पहाटे (२३ फेब्रुवारी) तीनच्या सुमारास निधन झाले, ते ८६ वर्षाचे होते. गुरुवारी रात्री त्यांना अत्यवस्थ वाटू लागल्याने जोशी यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ICUमध्ये उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली.

महाराष्ट्रातील पहिले बिगर काँग्रेसी मुख्यमंत्री, बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्र्वासू म्हणून मनोहर जोशी यांची ओळख होती. गेली काही वर्षे ते सक्रिय राजकारणापासून दूर होते. सुरुवातीला माधूकरी, त्यानंतर मुंबईतून येऊन शिकवणी वर्ग, 'कोहिनूर'ची स्थापना, १९७६ ला मुंबईचे महापौर, मार्च १९९० ते डिसेंबर ९१ विधानसभेचे विरोधी पक्षनेते, मार्च १९९५ ते जानेवारी १९९९ या काळात राज्याचे मुख्यमंत्री, ऑक्टोबर ९९ ते मे २००२ केंद्रात वाजपेयी सरकारमध्ये केंद्रीय अवजड उद्योग मंत्री, मे २००२ ते ऑगस्ट २००४ लोकसभेचे अध्यक्ष असा त्यांचा चढता प्रवास राहिला आहे.

बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केल्यावर पहिल्या फळीतील शिवसैनिक म्हणून त्यांनी राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. मुख्यमंत्री असतांना जावयाला भूखंडाचा लाभ मिळवून देण्याचा कथित आरोप त्यांच्यावर झाले. त्यानंतर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी जोशी यांना चिठ्ठी पाठवत राजीनामा देण्यास सांगितले. तेव्हा तात्काळ आदेश मानत जोशी यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. ही नाट्यमय घटना त्यानंतर अनेक महिने चर्चेचा विषय ठरली होती.ऑक्टोबर २०१३ च्या शिवाजी पार्क इथे झालेल्या दसरा मेळाव्यात मनोहर जोशी यांच्या विरोधात शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी केली होती. नोव्हेंबर २०१२ ला बाळासाहेब ठाकरे यांचे निधन, त्यानंतर त्यांच्या स्मारकाचा विषय, त्यावर केलेली टिप्पणी यामुळे

'अष्टपैलू' अशोक सराफ हे मराठी मातीतील अस्सल हिरा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : आपल्या अविस्मरणीय भूमिकांनी अष्टपैलू असणाऱ्या अशोक सराफ यांनी प्रेक्षकांची अभिरुची संपन्न केली. अवघ्या महाराष्ट्राला त्यांनी पोट धरुन हसवले. प्रसिद्धीचे इतके वलय मिळूनही त्यांनी कधीही जमीनीशी नातं तोडलं नाही. खऱ्या अर्थाने ते मराठी मातीतील अस्सल हिरा आहेत, अशा भाषेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या कार्याचा गौरव केला. मराठी चित्रपटसृष्टी साठी जे जे आवश्यक आहे, त्या सर्व सुविधा राज्यात उपलब्ध करून देण्याचा आणि जगाला हेवा वाटेल अशी फिल्मसिटी आपण तयार करू, असे प्रतिपादन त्यांनी केले. महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना तर मानाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ पार्श्र्वगायक सुरेश वाडकर यांना

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान आज करण्यात आला.त्यावेळी मुख्यमंत्री श्री शिंदे बोलत होते. याशिवाय, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीसाठी आपल्या कलेच्या माध्यमातून अनेक वर्ष योगदान देत रसिकांची व कलासृष्टीची सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा राजकपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात आले. या समारंभास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार मनीषा कायंदे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, महाराष्ट्र राज्य चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे आणि सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी मुख्यमंत्री श्री शिंदे, म्हणाले की, अष्टपैलू, हा शब्द ज्याला खऱ्या अर्थाने ज्यांना लागू होतो ते नाव म्हणजे अशोक सराफ आहे. सलग ५० वर्षे असंख्य भूमिका करुनही ज्यांच्यात अभिनयाची आणि नवं काही तरी करून दाखविण्याची त्यांची भूक अजूनही कायम आहे. अशोक सराफ हे वयाचा अमृत महोत्सव साजरा करत असताना राज्य सरकारचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार त्यांना देण्यात येतोय, हा अवघ्या महाराष्ट्रासाठी केवळ अभिमानाचाच नाही तर अमृताहूनही गोड क्षण असल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या वर्षी ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले आणि ज्येष्ठ निरुपणकार तिर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरवण्याची संधी मला मिळाली. यावर्षी अशोक सराफ यांचा आपण गौरव करत आहोत. त्यांनी त्यांच्या अभिनयाने मराठी रसिकांवर राज्य केले. प्रसिद्धीचे इतके वलय मिळूनही सराफ यांनी कधीही जमीनीशी नातं तोडलं नाही, असे त्यांनी सांगितले. मराठी रसिकांनीही त्यांच्या अभिनयावर भरभरुन प्रेम केले. त्यांच्याप्रमाणेच सुरेश वाडकर यांनी अत्यंत कष्टपूर्वक आपली सांगितीक कारकीर्द उभी केली. मराठी आणि हिंदीच । पान २ वर

शरद पवार गटाला अखेर चिन्ह मिळालं, निवडणूक आयोगाचं 'या' चिन्हावर शिक्कामोर्तब!

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला केंद्रीय निवडणूक आयोगाने अखेर पक्षचिन्ह दिलं आहे. निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला तुतारी हे पक्षचिन्ह आहे. पक्षाच्या अधिकृत सोशल मीडिया

खात्यावरून ही माहिती देण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षनाव व घड्याळ हे पक्षचिन्ह अजित पवार गटाला देण्याचा निकाल निवडणूक आयोगानं दिला होता. त्यानंतर शरद पवार गटाला नेमकं कोणतं नाव किंवा चिन्ह मिळणार? याची उत्सुकता राजकीय वर्तुळात लागून राहिली होती. त्यासाठी शरद पवार गटाकडून तीन नावांचे पर्याय निवडणूक आयोगाला सादर करण्यात आले होते. त्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार असं नाव देण्यात आलं. परंतु, हे नाव येत्या २८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीपुरतं होतं. त्यामुळे या निवडणुकीकरता पक्षाला चिन्ह देण्यात आलं नव्हतं. त्यामुळे हे प्रकरण शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात नेले होते. सर्वोच्च न्यायालयात नुकत्याच झालेल्या सुनावणीनुसार शरद पवार गटाला चिन्हासाठी निवडणूक आयोगात अर्ज दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसंच, अर्ज दाखल झाल्यानंतर निवडणूक आयोगाने आठवड्याभराच्या आत चिन्हाबाबत निर्णय देण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार, शरद पवार गटाने तीन पर्याय सुचवले होते. परंतु, त्यांनी दिलेल्या पर्यायांपैकी एकही चिन्ह केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलं नाही. तर, निवडणूक आयोगाकडून तुतारी हे चिन्ह देण्यात आलं. सर्वोच्च न्यायालयाकडून पुढील । पान २ वर

पंतप्रधान मोदींनी एफआरपी संदर्भात साखर कारखान्यांना दिले आदेश

पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार विषयक समितीने चालू गळीत हंगामात १०.२५ टक्के साखर उतारा असलेल्या कारखान्यांना उसाला प्रति टन ३४०० रुपये रास्त आणि किफायतशीर (एफआरपी) दर देण्याचे आदेश कारखान्यांना दिले आहेत. हा उसाला मिळालेला आजवरचा उच्चांकी दर आहे.

केंद्र सरकारने दिलेल्या माहितीनुसार, उसाला मिळालेला हा उच्चांकी भाव आहे. मागील गळीत हंगामाच्या तुलनेत तो सुमारे आठ टक्क्यांनी जास्त आहे. यंदाच्या हंगामात गाळप झालेल्या आणि १०.२५ टक्के साखर उतारा मिळालेल्या कारखान्यांनी गाळप झालेल्या उसाला सुधारित दराने एफआरपी द्यावी लागणार आहे.

केंद्र सरकारने उसाला दिलेली एफआरपी अ २ अधिक एफएल किंमतीपेक्षा म्हणजे उत्पादन खर्च अधिक शेतकऱ्याच्या कुटुंबाच्या श्रमाच्या किंमतीपेक्षा एफआरपी १०७ टक्क्यांनी जास्त असल्याचाही दावा केला आहे. हा जगात उसाला मिळणारा सर्वाधिक भाव आहे. या वाढीव एफआरपीचा शेतकऱ्यांना फायदा होईल, असेही म्हटले आहे.उसाला उच्चांकी दर देत असतानाच सरकार ग्राहक साखर स्वस्त दरात उपलब्ध करून देत आहे. देशातील पाच कोटी उस उत्पादक शेतकरी, साखर कारखानदार आणि ग्राहक, असा सर्वांचाच फायदा होणारा हा निर्णय आहे. पंतप्रधान । पान २ वर

मनोज जरांगेंच्या आंदोलनामागे शरद पवारांचा हात

मराठा आंदोलक संगीता वानखेडेंचे गंभीर आरोप

मुंबई : अजय महाराज बारसकर यांच्या पाठोपाठ आणखी एका मराठा आंदोलक महिलेने मनोज जरांगे पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी महाराष्ट्राला वेडच्यात काढलं. दंगल का घडली? मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामागे शरद पवारांचा हात आहे असाही दावा संगीता वानखेडेंनी केला. संगीता वानखेडे या मनोज जरांगे पाटील यांच्यासह मराठा आंदोलनात कार्यरत होत्या. मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर फारकत घेतल्यानंतर संगीता वानखेडेंनी त्यांच्यावर टीका केली आहे आणि आरोप केले आहेत.

महाराष्ट्राला मनोज जरांगेंनी वेडच्यात काढलं आहे. त्यांचं सुरुवातीपासून चुकतच आलं आहे. सरकारने दंगल घडली की घडवली त्याचा शोध घेतला पाहिजे. पोलिसांनी जो लाठीचार्ज झाला तेव्हा महाराष्ट्राचा उद्रेक दिसला. मनोज जरांगे पाटील कोण हे आधी मीडियाला माहीत नव्हतं. लाठीचार्ज झाल्यानंतर त्यांना डोक्यावर घेतलं. डॉ. प्रकाश आंबेडकर, राज ठाकरे, उद्धव ठाकरे, शरद पवार सगळे त्यांना भेटले. त्यानंतर मनोज जरांगेंना लोकांनी डोक्यावर घेतलं. त्यामुळेच मी त्यांच्याशी जोडले होते. मनोज जरांगे साधासुधा माणूस, आपल्या भाषेत बोलणारा माणूस म्हणून महाराष्ट्राने आणि मी विश्र्वास । पान २ वर

इंडिया आघाडीला बळ! दिल्लीत काँग्रेस-आप यांच्यात जागावाटपावर तोडगा

नवी दिल्ली : भाजपाला पराभूत करण्यासाठी विरोधकांनी इंडिया आघाडी स्थापन केली आहे. या आघाडीअंतर्गत काँग्रेसची पश्चिम बंगाल, पंजाब, उत्तर प्रदेश या राज्यांत वेगवेगळ्या पक्षांशी जागावाटपावर चर्चा चालू आहे. दिल्लीमध्येही काही दिवसांपासून आम आदमी पार्टी (आप) आणि काँग्रेस यांच्यात जागावाटपासाठी चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या होत्या. दरम्यान, आता या दोन्ही पक्षात जागावाटपावर अंतिम तोडगा निघाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार दिल्लीमध्ये आप चार तर काँग्रेस तीन जागांवर लोकसभेची निवडणूक लढवणार आहे. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्याने दिलेल्या माहितीनुसार आप आणि काँग्रेस यांच्यात जागावाटपावर एकमत झाले आहे. दिल्लीमध्ये आप एकूण चार तर काँग्रेस एकूण तीन जागांवर निवडणूक लढवणार आहे. यामध्ये काँग्रेसला पसंतीची एक तर आप पक्षाने दिलेल्या दोन अशा एकूण तीन जागा मिळणार आहेत. या युतीची अधिकृत घोषणा येत्या शुक्रवारी केली जाण्याची शक्यता आहे.

काँग्रेसच्या सूत्रांनुसार पूर्व आणि वायव्य दिल्ली मतदारसंघासाठी काँग्रेसकडून प्रयत्न केला जाणार आहे. तिसऱ्या जागेसाठी काँग्रेसकडून चांदनी चौक, नवी दिल्ली किंवा पश्चिम दिल्ली या मतदारसंघासाठी प्रयत्न केले जातील.दरम्यान,। पान २ वर

शेतकऱ्यांना हमीभाव नाही अन् गद्दारांना ५० खोक्यांचा भाव, उद्धव ठाकरेंचा घणाघात

बुलढाणा : भाजप आणि मिंधे सरकारच्या राजवटीत गद्दारांना ५० खोक्यांचा हमीभाव मिळाला. मात्र, चोहीबाजूने संकटाच्या चक्रव्युहात अडकलेल्या शेतकऱ्यांना भाव नाही. त्यांना केंद्रातील मोदी तर राज्यातील मिंधे सरकारने वाऱ्यावर सोडले आहे, अशी घणाघाती टीका शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. यामुळे लोकसभा निवडणुकीत हुकूमशाहीकडे वाटचाल करणाऱ्या मोदी सरकारला पायउतार करून गद्दारांना पराभूत करून जमिनीत गाडा, असे आवाहनही त्यांनी केले.

आजपासून बुलढाणा येथे दोन दिवसीय दौऱ्यावर आलेल्या उद्धव ठाकरेंची पहिली सभा आज, गुरुवारी चिखली येथे पार पडली. यावेळी बोलताना ठाकरे यांनी बंडखोर व भाजपवर टीकेचा आसूड उगारला. राजा टॉवर येथे रणरणत्या उन्हात पार पडलेल्या या सभेला सेना नेते खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत यांच्यासह शिवसैनिक बहुसंख्येने हजर होते. यावेळी ठाकरे यांनी गद्दारांना लक्ष्य केले.

शिवसैनिक व जनतेच्या ताकदीने मोठी झालेले गद्दारी करून तिकडे गेले. त्यांना ५० खोके लखलाभ होवो, पण त्यांना आता जनतेची साथ, आशीर्वाद लाभणार नाही हे नक्की आहे. त्यांनी आमचा धनुष्य चोरला, पक्ष चोरण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. मात्र, काहीही केले तरी त्यांच्या कपाळावरील गद्दारीचा काळाकुट्ट डाग पुसला जाणार नाही. येणाऱ्या निवडणुकीत जनता जनार्दन त्यांना त्यांची जागा दाखविणार ही काळ्या दगडावरची रेष आहे. माझा नरेंद्र मोदींना वैयक्तिक विरोध नाही, तर त्यांच्या हुकूमशाहीला अन एकाधिकारशाहीला विरोध आहे. त्यामुळे यंदाची लोकसभा निवडणूक ही या हुकूमशाही विरुद्ध आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक ही मतदारांची देखील कसोटी पाहणारी ठरली आहे. हुकूमशाही हवी की लोकशाही? याचा सारासार विचार करून मतदान करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे.

उत्तरेकडील हजारो शेतकरी पुन्हा दिल्लीच्या सीमेवर आले आहे. निडरपणे आंदोलन करीत आहे. गोळीबार, अश्रूधुर असे केंद्राचे अन्याय सहन करीत ते आंदोलन व आपल्या मागण्यांवर ठाम आहे. मात्र, महाराष्ट्रातील शेतकरी अन्याय सहन करत शांत आहे. बुलढाण्यातही असेच चित्र आहे. जिजाऊंच्या बुलढाणा जिल्ह्याचा अन शिवरायांच्या महाराष्ट्राचा स्वाभिमान गेला तरी कुठे? असा उद्विग्न सवाल ठाकरेंनी यावेळी केला.

यांचे उत्तर देताना त्यांनी भाजपने अडीच अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदाच्या वचनाचा भंग । पान २ वर

संपादकीय

तो टाळणे महत्त्वाचे असते...

गुलजार आणि रामभद्राचार्य यांना ज्ञानपीठ जाहीर होणे हे संवेदना आणि अध्यात्म या संगमाचा गौरव आहे. पहाटेच्या गारव्यात गवताच्या हिरव्यागार पानावर अलवार उतरणाऱ्या दवाच्या थेंबासारखे शब्द कागदावर उतरवणारे गुलजार तरल संवेदनांचे जादूगारच म्हणायला हवेत. संपूरन सिंह कालरा म्हणजेच गुलजारांच्या नावाला तरलता, पाऊस, पहाट, जाणिवा, प्रेम, संवेदना असे शब्द पर्याय ठरू शकतात. ज्ञान किंवा ज्ञानपीठ हा शब्द गुलजारांच्या लेखनाशी बदलत्या अर्थाने थोडासा विसंगत वाटावा. ज्ञान म्हणजे या अर्थाने माहितीचा संचय असा अर्थ गुलजारांशी सुसंगत नाहीच. ज्ञानाचा अर्थ प्रेमात शोधता येत नाही, तर प्रेमाचा अर्थ ज्ञानियाला उमजतोच असेही नाही. म्हणून प्रेम किंवा मानवी जाणिवा या ज्ञानाशी विसंगतच असाव्यात. गुलजारांचे लेखन म्हणजे नज्म, गजल टोकदार नाहीच असे नाही. मात्र, त्यांच्या शब्दांना धार नाही असेही नाही. परंतु, ही धार 'खुशबू बिखेरणाऱ्या' गुलाब-मोगरा किंवा पारिजात फुलांच्या पाकळ्यांची असावी. गुलजारांच्या लेखनात ज्ञानाचा अहंकार नाहीच नाही, ज्ञानासोबत प्रसंगी कठोरता, निर्णयक्षमता, अधिकारवाणी असले काहीसे येऊ शकते. ज्ञानाचा संबंध माणसाच्या नैतिक जाणिवेपेक्षा त्याच्या आत्मानुभूतीशी जोडल्यावर रवींद्रनाथ किंवा कुसुमाग्रज या नावांसोबतच ज्ञानपीठ हा शब्द साजेसा होतो. गुलजारांच्या बाबतीतही हीच आत्मानुभूती ज्ञानपीठ सोबत येते, हे ा पुरस्काराचे यशच आहे. गुलजारांनी बरेच लिहिले आहे. त्यांनी चित्रपटांच्या कथा, पटकथा, गाणीही लिहिलीत, दिग्दर्शनही केले आहे. अगदी ऑस्करची बाहुली गुलजारांचा जय हो म्हणत त्यांच्या दिवाणखान्यात विराजमान झाली आहे. कवी आणि कवितेवर आधीच्या काळाचा प्रभाव असण्याला कवीचा नाइलाज असतो. मात्र, गुलजारांवर काळाचा सकारात्मक किंवा नकारात्मक प्रभाव नाही. त्यामुळेच त्यांचे शब्द टोकदार आणि हळुवारपणाच्या मध्यममार्गातून नदीसारखे वाट काढत कागदाच्या डोंगरदऱ्यातून धावत असतात. गुलजारांच्या लेखनातले शब्द केवळ जागा भरण्याची कामे करत नाहीत, त्यांना एक शांततेचा अर्थ असतो, ही शांतता मौन असते, जगातल्या रोजच्या 'जगण्याच्या आवाजात' अशी मनातली शांतता ऐकू येत नाही, मग माणसे हळूहळू बहिरी होऊ लागतात, हे बहिरेपण बधिरतेपर्यंत पोहोचण्याच्या आत त्यावर इलाज करावा लागतो. अन्यथा हे बधिरलेपण हळूहळू माणसाला कुठल्याही संवेदना नसलेल्या निपचितपणाकडे घेऊन जाते, हा माणसाचा मृत्यूच असतो. तो टाळणे महत्त्वाचे असते.

ज्ञानियांना विज्ञान शिकवणारा संत

गाडगेबाबा नाव नाही तर विद्यापीठ आहे. या एका मानसाच्या विद्यापिठामध्ये कर्मकांड, अंधविश्र्वास, व्यसन कोणत्याच गोष्टिला थारा नसुन फक्त विज्ञानवाद व तर्कवादाची शिकवण देणारे संत म्हणजे गाडगेबाबा होत. धर्माच्या व देवाच्या नावावर पोट भरणाऱ्या व्यवस्थेला सुरुंग लावणारे व दगडामध्ये देव नाही हे आपल्या पहाडी आवाजातून किर्तनाच्या माध्यमातून गावोगावी फिरून कुणाचा एकही रूपया न घेता प्रबोधनाचे अविरतपणे काम करणारे गाडगेबाबा विचाराशी व ध्येयाशी एकनिष्ठ होते म्हणूनच या व्यवस्थेने गाडगेबाबा यांना दाबण्याचा प्रयत्न केला. परंतु सुर्य हाताने झाकत नसतो. जो सुर्य हाताना झाकण्याचा प्रयत्न करतो फक्त त्यालाच सुर्य दिसत नाही बाकी कुठेच त्यांचा परिणाम दिसत नाही असेच गाडगेबाबा बद्दल घडले व या बुवा बाजीच्या काळात अनेक बाबा जेल मध्ये असताना सुद्धा आम्हाला गाडगेबाबा वंदनीय आहेत. गाबगेबाबाचे विचार ऐकले तर आज स्वतः ला उच्च शिक्षीत समजणाऱ्या लोकांच्या डोक्यात मुंगा आणणारे आहेत. गाडगेबाबा यांचे विचार एवढे धारदार आहेत कि ते व्यवस्थेची सरळ चिरफाड करून विज्ञान व तर्कवादाची शिकवण देऊन समाजामध्ये समता निर्माण करतात. अशिक्षित गाडगेबाबा यांच्या विचाराची भिती येथील मनुवाद्यांनी घेतलेली आहे की या मानसाचे क

विचार कोणत्याच प्रसार माध्यमाच्या माध्यमातून व्यवस्था दाखवु शकत नाही. कारण त्यांना माहिती आहे गाडगेबाबा यांच्या विचारांना आपण थोडी जरी प्रसिद्धी दिली तर पुजाऱ्याचे पाट उपाशी मरणार. म्हणून या पुजाऱ्याच्या व्यवस्थेने गाडगेबाबा ला थोडे दुरच ठेवले आहे.

गाडगेबाबांची कणखर वाणी आणि त्यातही धारधार शब्दांने हजारो वर्षापासून चालत आलेल्या रुढी परंपरा यावर फक्त प्रबोधनच नाही तर स्वतः झुगारून जनजागृती करणारा हा महान संत. आज गाडगे महाराज यांचे विचार सुशिक्षित व्यक्ती वाचु शकत नाही. गाडगे महाराजांचे विचार व्यवस्था चिरणारे असले तरी मानसिक गुलामांना ते जास्त त्रास देतात. मानसिक गुलाम लोकांना गाडगेबाबा धर्माचे विरोधक वाटतात. आजचा शिकलेला वर्ग गाडगेबाबांच्या विचाराने चालायला घाबरतो. त्याची हिम्मतच होत नाही एवढे भेकड व भित्रे लोक या व्यवस्थेने निर्माण केलेले आहेत. विज्ञानाला समोर ठेवून तर्काच्या आधारावर लोकांना सांगून लोकांचे डोके साफ करताना गाडगे बाबा म्हणायचे....

गोपाला गोपाला
देवकी नंदन गोपाला
सांभाळ तुझ्या लेकराला
पुण्य समजती पापाला
हि धोंड्याला म्हणती देवता
भगत धुंडती तया जोगता
स्वतःच देती त्यास योग्यता
देव म्हणून कोणी न भजावे, फुका शेंदरी दगडाला

वरिल विचार लोक ऐकु पण शकत नाहीत परंतु गाडगे महाराज यांनी महाराष्ट्र भर या विषयावर प्रबोधन केले. दगडाला माहिती नसते आपण कोण आहोत आपणच दगडाचे महत्त्व ठरवतो जागृत देवस्थान, नवसाला पावणारे देवस्थान, मुल होणारे देवस्थान, देव व दगडाचा जेव्हा विषय येतो तेव्हा भावनिक होऊन धर्माच्या ढालिचा वापर करतात. कोणता धर्म अज्ञानी राहायचे सागंतो? आणि जो अज्ञानी रखहण्यासाठी सांगतात तेथे अज्ञानी राहणाराचा नाही अज्ञानी ठेवणाऱ्याचा धर्म असतो हि साधी गोष्ट आपल्या लक्षात येत नाही. देवाच्या नावाखाली लोक अकार्यक्षम बनत आहेत. आज गाडगेबाबा जयंती दिनी मी धाडस करुन व्यवस्थेला एक प्रश्न करणार आहे. हजारो वर्षापासून देवाच्या व कर्मकांडाच्या नावाखाली आमचा पैसा लाटला व लाठत आहात. तुम्ही जर देवाचे मध्यस्ती आहात तर मला कोणत्याही जागृत देवाचे ठिकाण सांगा तेथे जाऊन तुमच्या च परंपरेप्रमाणे मी पुर्ण विधी करतो आणी माझ्या साठी नाही देशासाठी मागतो. दहशतवादी हल्ले होतात तर आमच्या सैनिकांना मरू देऊ नको. देशात शेतकऱ्यांना फाशी घेऊ देवु नको आणि बलात्कार करणाऱ्या लोकांना नपुंसकत्व येऊ दे. हे काम देशासाठी करतोय कोणत्याही साधुने मला या साठी मदत करावी. चुकीचे कामं करून गोरगरीब जनतेला लुटून स्वतः च स्वतः ची पाठ थोपटणारे , मी केलेले काम हेच योग्य आहे म्हणून मिरवणारे लोक कमी नाहीत. गाडगेबाबा यांची एक एक ओवी मानसिक गुलामांच्या व धर्माच्या ठेकेदाराच्या काळजात घुसते आणि हे खोटे असेल तर लाख रूपये पगार घेणारा व स्वतः जवळ बंदुक बाळगणाऱ्या लोकांनी बोलुन दाखवावे धोंड्याला म्हणती देवता. दगडाला लोक देव समजतात आणि त्याची पुजा अर्चा करतात. पुजा अर्चा फुकट होत नाही. दान द्यावे लागते दगडाला बोलता येत नाही, स्वतः चे रक्षण करता येत नाही, अंघोळ करता येत नाही, धोतर नेसता येत नाही, स्वतः च्या घरात दिवा लावता येत नाही तो देव लोकांच्या घरात काय दिवा लावणार हे शब्द सगळे अडाणी असलेले परंतु विद्वान असलेल्या गाडगे बाबांचे आहेत. गाडगेबाबा यांचे शब्द कानाला व मनाला झोंबणारे असले तरी परिवर्तन करणारे आहेत मात्र हे शब्द लोकांपर्यंत पोहचुन नाही याची पुर्ण व्यवस्था या व्यवस्थेने केली आहे. गाबगेबाबाचे आपल्या किर्तनातुन सांगतात देव घर देत नाही, देव भाकर देत देव काहीच देत नाही तरी आम्ही देवाची पुजा करून पुजाऱ्याला दान देतो परंतु घर बांधणाऱ्या गवंड्याचा आम्ही सत्कार करत नाहीत. भटजीच्या हाताने सत्यनारायण करतो. हे विचार गाडगे महाराजांचे आज किती लोक स्विकारतात, किती लोक गाडगेबाबा यांनी दिलेल्या मार्गावर चालण्याचे धाडस करतात. गाडगे महाराजाच्या विचारावर चालायला शिक्षण नाही तर मानसिक धाडस महत्त्वाचे आहे. आज किती लोक आहेत की नवीन घर घेतले तर त्या घरात कोणतीच पुजाअर्चा न करता राहायला जाता . किंवा घर बांधणाऱ्या मजुराचा सत्कार करतात. तर एकहि नाही लोक म्हणत असतील आम्ही भटजीला न बोलवाता आम्ही च सगळा कार्यक्रम केली केला तर हे परिवर्तन नाही उलट भटजी उपस्थित नसताना सुद्धा त्याची व्यवस्था टिकण्याचे आपण प्रयत्न करत असतो. लिंबु मिरची खातात की लटकवतात याची अक्कल नसलेले लोक शिक्षीत आहे असे म्हणताच येणार नाही.

कुणी रहावे खुळे अडाणी
शिक्षण घ्यावे व्हावे ज्ञानी
याच साठी झिजते ही वाणी

गाडगेबाबा स्वतः अडाणी असले तरी त्यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षण म्हणजे लिहता वाचता येणे नाही तर खरं आणि खोटं यातील फरक समजून खोट्याला झुगारून खऱ्याचा स्विकार करणे म्हणजे शिक्षण होय. गाडगेबाबा यांच्या नजरेतून पाहिले तर एकही माणुस अजूनही शिक्षीत झाला नाही. खरं आणि खोटे यातील फरक अजुनही कळालेला नाही म्हणून च बहुजन समाजाच्या बाया भोगून जेल मध्ये गेलेल्या आसारामचे फोटो आजही लोकांच्या घरात आहेत परंतु आसाराम सारखे लोक तयारच होऊ नये याची व्यवस्था निर्माण करणारे गाडगेबाबांचे फोटो घरात लावणे आजही या शिकलेल्या लोकांना जमले नाही. दारू पिऊन कुटुबांची राखरांगोळी करू नका असा संदेश देऊनही आज जेवढा जास्त पगार तेवढा महागडा ब्रँड लोक पितात व सगळी कमाई त्यात घालतात.

जे लोक कोणतेच काम करत नाही ते लोक तुपाचा शिरा खातात आणि आम्ही काम करू करू आमच्या पिढ्या बरबाद झाल्या तरी आज तुप मिळत नाही हि व्यवस्था निर्माण झाली आहे म्हणून आपण खरं काय समजून घेतलं पाहिजे. म्हैस विकत घेऊन, तिला चारायला नेने आणने, तीची साफसफाई करून दुध काढणारे हे बहुजन आहेत दुग्धजन्य पदार्थ खाणारे मात्र लोक वेगळे आहेत म्हणून जागृती करून आपला शत्रु कोण याची ओळख होणे महत्त्वाचे आहे. पण आज आम्हाला शत्रु आणि मीत्र याची ओळख नाही. गाडगे बाबा यांनी समस्त आयुष्य हे समाजाच्या परिवर्तनासाठी खर्ची गातले परंतु आजही समाजात परिवर्तन झाले नाही ही मोठी खेदाची गोष्ट आहे. परिवर्तन होते जर आपण गाडगेबाबा यांचे विचार वाचले व स्विकारले तर पण गाडगेबाबांचे विचार वाचायला खुप मोठे काळीज पाहिजे. आणि माणसिक गुलाम लोकांकडे काळीज नसते म्हणून आज ते देवाची पुजा भक्तीने तर भितीने करत आहेत जर मी असं केले नाही तर कोप होईल प्रकोप होईल वैगेरे वैगेरे.

अंधविश्र्वास, कर्मकांड, सत्यनारायण यामाध्यातुन आपण आपले नाही तर पुजाऱ्याचे भले करत असतो. देव देवळात नाही देवळात पुजाऱ्याचे पोट असते कसे गाडगेबाबा सांगुन गेले तरी आज पर्यंत ना विचार आचार ना तर्क केला. परंतु हे सगळं अगोदरच गाडगेबाबा यांनी आपल्या आयुष्य भर सांगतच गेले. आज गाडगेबाबा जयंती दिनी विज्ञानवादी बनण्याचा प्रयत्न करू या.

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

पान १ वरुन

'अष्टपैलू' अशोक सराफ हे मराठी..

नव्हे तर विविध भाषांतील त्यांची गाणी विशेष गाजली. सुरेशजींचा सुरेल आवाज आजही आपल्याला मंत्रमुग्ध करतो, अशा शब्दात त्यांनी ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांचा गौरव केला.

मुख्यमंत्री म्हणाले की, मुंबईतल्या फिल्मसिटीत शुटीगसाठी लागणाऱ्या सर्व अत्याधुनिक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच, मुंबई फिल्मसिटीबाहेर इतर जिल्ह्यात चित्रपटाची शुटींग करायची असेल तर 'वन विंडो सिस्टीम'चा निर्णय सांस्कृतिक विभागाने घेतलाय. या शुटींगसाठी कोणतेही शुल्क घेतले जाणार नाही. राज्यात ७५ नावे चित्र नाट्यगृह उभरण्यासाठी ९ कोटी ३३ लाखाचा निधी मंजूर केला असल्याचे त्यांनी सांगितले.

अशोक सराफ हे मराठी चित्रपटाचा चेहरा: उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आजचा दिवस सगळ्यांसाठी आनंदाचा दिवस आहे. चित्रपट पुरस्कारांचा बॅकलॉग भरून काढला. आज आपले कलाविश्र्व समृध्द करणारे अनेक मोठे कलावंत येथे आहेत. चित्रपट सृष्टीला आणि आपल्या जीवनाला समृध्द करणारी ही मंडळी आहेत. अशोक सराफ यावर्षी ७५ वर्षाचे झालेत. त्यांच्या अमृत महोत्सवात आपण त्यांना महाराष्ट्र भूषण देत आहोत. मराठी चित्रपटाचा चेहरा हे अशोक सराफ आहेत, अशी भावना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केली. ते म्हणाले की, मराठी, हिंदी चित्रपटसृष्टी, नाटक यामध्ये सर्व पद्धतीच्या भूमिका अशोक सराफ यांनी साकारल्या. त्यांनी साकारलेला नायक हा स्वप्नातील नव्हे तर खऱ्याखुऱ्या जीवनातील नायक वाटायचे. त्यांचे चित्रपट पाहून आम्ही मोठे झालो. याशिवाय, सुरेश वाडकर यांनी गेल्या कित्येक वर्षे त्यांच्या सुरेल आवाजाने रसिकांचे मनोरंजन केले. ज्या लोकांनी आपले जीवन आनंदमय केले, त्यांना पुरस्कार देण्याची संधी आपल्याला मिळाली, अशी भावनाही यांनी यावेळी व्यक्त केली.महाराष्ट्राची भूमी ही कलाकारांची खाण: मंत्री सुधीर मुनगंटीवार

सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, महाराष्ट्र हे जसे आर्थिक शक्तिकेंद्र आहे तसे ते सांस्कृतिक शक्तिकेंद्र आहे. महाराष्ट्राची भूमी ही आता कलाकारांची खाण झाली आहे. या कलावंतांचा सन्मान करताना सांस्कृतिक कार्य विभाग सोनेरी झाला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

फिल्मसिटीच्या बाहेर जिथे चित्रीकरण असेल तिथे शुल्क आकारले जाणार नाही. मनोरंजन करातून सुट या अगोदरच दिली असल्याचे सांगून जगातील सर्वात उत्तम फिल्मसिटी करू शकतो, असा विश्र्वास मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

रसिक प्रेक्षकांचे प्रेम कायम हृदयात राहील: अशोक सराफ

महाराष्ट्रातील एक क्रमांकाचा पुरस्कार तुम्ही मला दिलात, याचा खरोकर आनंद आहे. माझ्या जन्मभूमी आणि कर्मभूमी ने माझा गौरव केला. महाराष्ट्र भूषण मिळणाऱ्यांची यादी भाली मोठी. त्यात मला स्थान दिले ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. पन्नास वर्षात प्रवासात ज्यांनी मला कळत नकळत का होईना त्यांनी मदत केली आहे, ही सगळी त्यांची किमया आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे रसिक प्रेक्षक. जे आवडले तर डोक्यावर घेतात. रसिकांना आवडलं पाहिजे हाच दृष्टीकोन ठेवला. रसिकांनी प्रेम दिले. ते उपकार मी कधीच फेडू शकणार नाही. माझ्या ह्रदयात हे प्रेम कायम राहील, अशी भावना यावेळी अशोक सराफ यांनी व्यक्त केली.

लतादीदींच्या नावे पुरस्कार हा आशीर्वाद: सुरेश वाडकर

यावेळी मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ पार्श्र्वगायक सुरेश वाडकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. लताजींच्या नावाचा पुरस्कार हा आशीर्वाद आहे. आजही लतादीदी आपल्यात आहेत, हीच भावना असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रधान सचिव श्री. खारगे यांनी केले. सांस्कृतिक दृष्ट्या समृध्द असे आपले राज्य आहे. महान सांस्कृतिक वारसा जतन आणि संवर्धन करण्यात कलावंतांचा मोठा वाटा आहे. विविध सांस्कृतिक पुरस्कार, महोत्सव आयोजित करून व्यासपीठ निर्माण करण्याचे काम राज्य शासन करीत आहे.तीन वर्षाचे पुरस्कार यावर्षी देत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि मान्यवरांच्या हस्ते राजकपूर जीवनगौरव पुरस्कार २०२० ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती अरुणा इराणी, सन २०२१ साठी ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती आणि सन २०२२ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती हेलन यांना प्रदान करण्यात आला. तर राजकपूर विशेष योगदान पुरस्कार सन २०२० साठी ज्येष्ठ दिग्दर्शक जे. पी. दत्ता, सन २०२१ साठी ख्यातनाम गायक सोनू निगम आणि सन २०२२ साठी विधू विनोद चोप्रा यांना प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांच्यावतीने त्यांचे स्नेही श्री. विजय यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात आला. सन २०२० साठी ख्यातनाम चित्रपट अभिनेते स्व. रविंद्र महाजनी (मरणोत्तर), सन २०२१ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती उषा चव्हाण आणि सन २०२२ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती उषा नाईक यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्व. रवींद्र महाजनी यांचा पुरस्कार त्यांचे पुत्र गश्मिर महाजनी यांनी तर श्रीमती उषा चव्हाण यांच्यावतीने विजय कोंडके यांनी पुरस्कार स्वीकारला.चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार सन २०२० साठी चित्रपट दिग्दर्शक गजेंद्र अहिरे, सन २०२१ साठी ज्येष्ठ पार्श्र्वगायक रवींद्र साठे आणि सन २०२२ साठी प्रसिद्ध चित्रपट अभिनेते-दिग्दर्शक नागराज मंजुळे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी चित्रपट समीक्षक अशोक राणे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर यांनी केले तर सांस्कृतिक कार्यक्रम आणि चित्रपट पुरस्कार सोहळ्याचे सुत्रसंचलन अभिनेता अमेय वाघ आणि अभिनेत्री वैदेही परशुरामी यांनी केले.

शरद पवार गटाला अखेर चिन्ह ..

आदेश येईपर्यंत तुतारी हे पक्षचिन्ह शरद पवार गटाकडे राहणार आहे.एक तुतारी द्या मज आणुनि फुंकिन मी जी स्वप्राणाने भेदुनि टाकिन सगळी गगने दीर्घ जिच्या त्या किंकाळीने अशी तुतारी द्या मजलागुनी!, अशी केशवसुतांची कविता पक्षाच्या अधिकृत खात्यावरून पोस्ट करण्यात आली आहे. तसंच, महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवरायांच्या शौर्यानं ज्या तुतारीने दिल्लीच्या तख्ताच्याही कानठळ्या बसवल्या होत्या, तीच 'तुतारी' आज निवडणूक चिन्ह म्हणून निश्र्चित होणं ही 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार'साठी गौरवास्पद बाब आहे. महाराष्ट्राचं आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांनी, आदरणीय खा. शरदचंद्र पवार साहेबांच्या साथीने दिल्लीच्या तख्ताला हादरवून सोडण्यासाठी हीच 'तुतारी' पुन्हा एकदा रणशिंग फुंकण्याकरिता सज्ज आहे!, असंही पोस्टमध्ये लिहिण्यात आलं आहे.

मनोज जरांगेंच्या आंदोलनामागे

ठेवला होता. मी एक महिन्यापूर्वी पर्यंत त्यांच्यासह होते. पण आता मी त्यांच्यासह नाही.नामदेवराव जाधव यांच्यावर शाईफेक झाली तेव्हाही मनोज जरांगे यांनी काहीच प्रतिक्रिया दिली नाही. मंगेश साबळे कोण हे माहीत नाही असं सांगितलं. मी या मनोज जरांगेची बाजू घेऊन भुजबळांना ट्रोल केलं. मात्र माझ्याविषयी गलिच्छ भाषा वापरण्यात आली. मी तळतळीने बोलत होते. त्यावेळी मला फोन आले, फेसबुकवर फोन आले. संगीता वानखेडेला एकटी समजू नका इतकंच बोलायचं होतं. मात्र या बाबाचं वक्तव्य होतं की मी त्या बाईला बोलायला सांगितलं नव्हतं. मला ती बाब खटकली, मला तेव्हा खूप मनस्ताप झाला. मी रेकॉर्डिंग ऐकलं आहे त्यामुळे मी हे बोलते आहे. मनोज जरांगेंची गडबड आहे हे मलाही कळत होतं. त्यामुळे मी साथ सोडली. मागच्या दीड महिन्यापासून त्यांचा विरोध करते आहे. मी सोशल मीडियावर आहे. मला उदयनराजेंच्या सहकारी फोन करत आहेत. छत्रपतींची गादी माझ्या पाठिशी आहे. मात्र हा माणूस सहानुभूती म्हणूनही काही बोलत नाही. असंही संगीता वानखेडे म्हणाल्या.

बारसकर महाराज यांनी जे सांगितलं तेच बरोबर आहे. मनोज जरांगे पाटील कुणालाच विश्र्वासात घेत नव्हते. एक फोन यायाचा आणि ते पुढची दिशा सांगायचे. तो फोन शरद पवारांचाच असणार दुसरं कोण असणार? शरद पवार त्यांच्यामागे आहेत. आंदोलनाचा सगळा खर्च शरद पवारांनी केला आहे. कालांतराने हे सत्य बाहेर येईल असंही संगीता वानखेडे यांनी म्हटलं आहे. माझं तोंड कुणी बंद करु शकणार नाही. बारसकर यांच्याकडे पुरावा आहे. जरांगे काल काय म्हणाले? हे तर एक-दोनच आहेत. अजून बाहेर येतील असं म्हणाले होते. लोक आता बाहेर येतील. यांची मतं पटलेली नाही आणि लोक फुटलेत. त्यामुळे लोक बाहेर येणार आहेत असंही वानखेडे म्हणाल्या.

मनोज जरांगेंनी कुठल्याही पक्षाच्या नेत्याला नीट उत्तर दिलं नाही. शरद पवार जेव्हा भेटायला गेले तेव्हा यांची भाषा बदलली होती. त्यावेळी मला वाटलं होतं मराठ्यांना आरक्षण मिळतंय ना? चांगलं होतं आहे. म्हणून मी साथ दिली. शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांवर हल्ले झाले की हा लगेच गुन्हे मागे घेण्याची मागणी करतो असाही आरोप संगीता वानखेडे यांनी केला. जे शरद पवारांना हवंय तेच या माणसाला पाहिजे आहे. या सगळ्यामागे शरद पवार आहेत. कारण शरद पवारांचा पक्ष संपला आहे. त्यामुळे राडा, गोंधळ आणि राडा घातला जातो आहे. शरद पवारांच्या म्हणण्याप्रमाणेच मनोज जरांगे वागतो असाही आरोप संगीता वानखेडेंनी केला आहे.

इंडिया आघाडीला बळ!

आप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी दिल्लीसह इतर राज्यातील जागावाटपावरही तोडगा काढला आहे. यामध्ये गुजरात राज्याचा समावेश आहे. पश्र्चिम बंगालमध्ये काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस या पक्षांत जागावाटपावर चर्चा चालू आहे. पंजाबमध्ये काँग्रेस आणि आप हे दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याच्या मानसिकतेत आहेत. उत्तर प्रदेशमध्येही काँग्रेस आणि समावादी पार्टी यांच्यात तोडगा निघालेला नाही. असे असताना दिल्लीमध्ये आप आणि काँग्रेस यांच्यात यशस्वी जागावाटप झाल्यामुळे इंडिया आघाडीला बळ मिळाले आहे.

शेतकऱ्यांना हमीभाव नाही अन

केल्यामुळे हे केले. त्यांनी शब्द तोडल्याने हे करावे लागले. पंतप्रधान वाजपेयी मोदींना बाहेर फेकायला निघाले तेव्हा फक्त बाळासाहेब ठाकरेंनी त्यांना वाचविले, त्यांचे समर्थन केले, हे सत्यही 'ते' विसरले अशी टीकाही त्यांनी केली.आज सगळ्या यंत्रणांचा घरगडी प्रमाणे वापर सुरू आहे. आयोगाने आमच्या पक्षाचे नाव बदलले. यामुळे आम्हीही त्यांचे नाव बदलून 'धोंड्या' असे ठेवलंय. धोंड्याच्या कारवाईचा निवडणुकीत आमच्यावर काहीच परिणाम होणार नाही, कारण जनता आमच्या पाठीशी असल्याचे ठाकरे म्हणाले.

पंतप्रधान मोदींनी एफआरपी

नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची दिलेली हमी पूर्ण केली आहे, असाही दावा केंद्राकडून करण्यात आला आहे.साखर कारखाने मोडीत काढण्याचा डाव केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी दर दिल्याचा दावा करीत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

श्री विठ्ठल सभा मंडप येथे ह.भ.प. औसेकर महाराज यांचे चक्रीभजन संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी, कार्तिकी, माघी, चैत्री अशा चार प्रमुख यात्रा पंढरपूर येथे मोठ्या प्रमाणात भरतात. त्यापैकी माघी यात्रा संपन्न होत असून, माघ शुद्ध त्रयोदशीला श्री विठ्ठल सभामंडप येथे ह.भ.प. औसेकर महाराज यांच्या चक्रीभजनाची परंपरा आहे.

आज २२ फेब्रुवारी, २०२४ रोजी दु.२.०० ते ५.०० या वेळेत सभामंडपात चक्रीभजन संपन्न झाले. सदर चक्रीभजन सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांनी केले. यावेळी मंदिर समितीचे सह अध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्या श्रीमती शकुंतला नडगिरे, व्यवस्थापक श्री बालाजी पुदलवाड तसेच १००० ते १५०० भाविक उपस्थित होते.शके १७१८ पासून आजतागायत चक्रीभजनाची परंपरा देगुलरच्या गुरुगुंडा महाराजांपासून संस्थांनचे मुळ पुरुष सद्गुरु विरनाथ महाराज यांना मिळाली. चक्रीभजन म्हणजे संसाराच्या चक्रातून, भयातून मुक्त करणारे भजन आहे. या परंपरेमध्ये काही बसून तर काही उभारुन भजन केले जाते. हे भजन नृत्य करत केले जाते. देहाची विदेही अवस्था प्राप्त करुन देते. औसेकर घराण्याची १७९२ सालापासून माघ वारी काळात श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या सेवार्थ चक्री भजनाची परंपरा सुमारे २४४ वर्षापासून ही सेवा अखंडपणे श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी देण्याचे काम औसेकर घराण्यातून केली जाते. या चक्री भजनाच्या माध्यमातून १४ भजन म्हणले जातात. चक्री भजनामध्ये वारकरी संप्रदाय पूर्णपणे रंगून जातो असे औसा संस्थांनचे अध्यक्ष तथा मंदिर समितीचे सह अध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.

मंदिर समितीने मंदिरात होणारे मोठे सोहळे / कार्यक्रम विविध समाज माध्यमात लाईव्ह करण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार सदर सोहळा मंदिर समितीचे अधिकृत संकेतस्थळ, युट्युब व फेसबुक यासारख्या समाज माध्यमाद्वारे लाईव्ह टेलिकास्ट करण्यात आला होता. त्यामध्ये हजारो भाविकांनी घरबसल्या सोहळा अनुभवला.

पंढरीत भर दिवसा एकावर कोयत्याने जबरी घाव काळा मारुती चौकात घटना शहरात भीतीचे वातावरण

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपुरात पंढरीत भर दिवसा एकावर कोणत्याही जबरी वार घाव काळा मारुती चौकातील ही घटना पंढरपूर शहरांमध्ये भीतीचे वातावरण पंढरपूर शहरात दिवसा ढवळ्या कोयत्याने बोलबाला शहरातील गजबजलेल्या दिनेश देवमारे या पाच चार ते पाच जणांच्या टोळक्याने कोयत्याने वार करून गंभीर जखमी केल्याची प्राथमिक माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे आणि चेहऱ्यावर गंभीर असे वार झाले आहेत दिनेशला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयामध्ये दाखल केली आहे घटनेनंतर तात्काळ पोलीस पथक घटना स्थळी दाखल झाले या घटनेनंतर शहरातील कोयता गँग सक्रिय झाले असून अशी भीती पंढरपुरामध्ये कोयता यांची दहशत निर्माण होत असल्याची चर्चा होत आहे याची पंढरपूर मध्ये या घटनेची मोठी खळबळ उडाली आहे

पंढरपूर शहराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्रवजीत घोडके हे कशा पद्धतीने आरोपींच्या मुस्क्या आवडतात याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे पोलीस तपास सुरू असून आरोपीच्या विरोधात फिर्याद देण्याचे काम सुरू आहे असल्याची पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले याबाबत पंढरपूर शहर पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्रवजीत घोडके यांच्याशी संपर्क साधला असता पंढरी नगरीमध्ये पंढरपुरात कोणतेही कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केल्यास याचा संबंधित प्रकरणी सविस्तर चौकशी करून संबंधितांकडे कारवाई केली जाईल असा इशाराही पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्रवजीत घोडके यांनी दिली आहे

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना झेड प्लस सुरक्षा

नवी दिल्ली :काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. गृह मंत्रायलाने दिलेल्या आदेशानुसार मल्लिकार्जुन खरगेंना झेड प्लस सुरक्षा देण्यात येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आय.बी.ने काढलेल्या थ्रेड सेप्शन रिपोर्टच्या आधारे काँग्रेस अध्यक्षांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.मल्लिकार्जुन खरगे यांना मिळालेल्या झेड प्लस श्रेणीच्या सुरक्षेत सी.आर.पी.एफ.चे एकूण ५८ कमांडो २४ तास सुरक्षा पुरवणार आहेत. विशेष म्हणजे, काँग्रेस अध्यक्षांना मिळालेल्या झेड प्लस श्रेणीची सुरक्षा देशभरात दिली जाणार आहे. म्हणजेच, खरगे देशातील कोणत्याही कानाकोपऱ्यात गेले तरीदेखील त्यांच्या सुरक्षेसाठी सी.आर.पी.एफ.चे ५८ कमांडो सोबतीला असणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मुस्लिम समाजातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण

अक्कलकोट/सोहेल फरास : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव निमित्त अक्कलकोट शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीचे मुख्य

आकर्षक अमोलराजे भोसले मित्र मंडळाचा भव्य लेझीम पथक.

ही मिरवणूक शहरातील जुना राजवाडा येथून निघून कमला राजे चौक, ए-वन चौक,नवीन राजवाडा,बस स्टॅन्ड,विजय चौक येथून शहरातील मुख्य कारंजा चौक मक्का मस्जिद येथे आल्यावर मुस्लिम समाजातर्फे व एस एस सोशल ग्रुप पंच तालीम अक्कलकोट यांच्यातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करण्यात आले व अन्नछत्र मंडळाचे विश्रवस्त मा.अमोल राजे भोसले व श्री स्वामी समर्थ वटवृक्ष देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे व मिलन कल्याणशट्टी यांच्याही सद्दाम शेरीकर मित्रपरिवार व मुस्लिम समाजातर्फे सत्कार करण्यात आले.त्यानंतर अन्नछत्र मंडळाचे विश्रवस्त मा.अमोल राजे भोसले व श्री स्वामी समर्थ वटवृक्ष देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते शिवभक्तांना सुगंधी दुधाचे वाटप करण्यात आले.यावेळी मा.अमोल राजे भोसले,महेश इंगळे,सुरेशचंद्र सूर्यवंशी (काका), नगरसेवक सद्दाम शेरीकर ,ननु कोरबु,सरफराज शेख,इरफान दावणा, मैनुद्दीन कोरबु,शिवराज स्वामी,अविनाश मडीखांबे,आकिब शेरिकर,सोहेल फरास,अजीम शेरिकर, हुसैन बळोरगी,बुडन शेख,वाहिद फुलारी,अझर जंगी, तौफीक बागवान, मुस्लीम बांधव व एस एस सोशल ग्रुप, सद्दाम शेरिकर मित्र परिवार आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेच्या युगात आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा : धरमशी

स्वेरीत एफडीपी अंतर्गत 'पहेला कदम' हा उपक्रम संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः 'स्पर्धेच्या युगामध्ये सर्वजण नुसते धावतच आहेत परंतु ही धाव योग्य दिशेला आहे का? हे देखील पाहणे महत्वाचे आहे. खरे तर आपण पळण्यापूर्वी दिशा ठरवली तर नियोजित ठिकाणी लवकर पोहोचू. यासाठी सर्वप्रथम कोणतेही कार्य करत असताना मनामध्ये सुरवातीला अनेक गोष्टी नकारात्मक येतात. आपण त्या नकारात्मक गोष्टींचा स्वीकार करू नये. सकाळी उठल्यापासून आवडत्या, जबाबदारीच्या आणि चांगल्या कामास सुरुवात करा, त्यामुळे दिवसभर सकारात्मक उर्जा कायम राहील. त्यामुळे आपले ध्येय, जिद्द न सोडता आपण आपले कार्य साध्य करण्याच्या मागे रहा. ध्येय ठरवले की ते साध्य होऊ शकते. जगाचा विचार केला तर स्वतःकडे दुर्लक्ष होते. म्हणून या स्पर्धेच्या युगात सर्वप्रथम आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा.' असे आवाहन ख्याती फायनान्शिअल ॲडवायझरचे डायरेक्टर अनिल धरमशी यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कॉलेज ऑफ फार्मसीच्या पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवीचे विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच चारही महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी फॅक्लटी डेव्हलपमेंट प्रोग्राम (एफडीपी) अंतर्गत 'पहेला कदम' (द फर्स्ट स्टेप) या मार्गदर्शनपर उपक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी ख्याती फायनान्शिअलचे डायरेक्टर अनिल धरमशी हे मार्गदर्शन करत होते. स्वेरी गीतानंतर प्रास्ताविकात संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी 'आपल्या हाती घेतलेल्या कार्यात सकारात्मकता कशी असावी, सांघिक कार्य कसे करावे, सर्वांना विश्रवासात घेऊन सर्वांच्या सहकार्याने कसे नेतृत्व करावे? हे सांगताना त्यांनी खर्डीतील वस्तीवरील साध्या झोपडीतून सुरु झालेल्या प्रवासात जिद्द, कठोर मेहनत व आत्मविश्रवासाच्या बळावर मिळविलेल्या यशाचे गुपित सांगताना त्यांनी आयुष्यामध्ये सकारात्मक विचार केल्यास भविष्यात प्रचंड फायदा होतो.' असे सांगितले. प्रमुख पाहुणे सल्लागार धरमशी पुढे म्हणाले की, 'शुद्ध हवा आणि शुद्ध मन एकत्र आले तर आपण ठरवलेले ध्येय पूर्ण करू शकतो. यासाठी आपल्या कार्यात आपण प्रामाणिक रहा. यातून करत असलेल्या कार्यातील पारदर्शकता कोणाचीही शिफारस नसताना समजून येते. कोणी खुश होईल असे काम न करता जे काम करायला हवे तेच करावे. यामुळे काही काळ आपला बॉस नाराज होईल पण कार्यातील दर्जा, न्यायप्रियता व पारदर्शकता पाहिल्यास बॉसचा बॉस देखील प्रेरीत होतो. ज्यावेळी माणूस स्वतः प्रामाणिक असतो तेव्हा तो जिद्दीने पेटतो. त्यावेळी विश्रव देखील ठेंगणे असते. यासाठी आपण नेहमी सकारात्मक विचार करणे गरजेचे आहे. जीवनात गुरुजनवर्ग, आई व वडील यांचा मानसन्मान ठेवा. कारण गुरु, आई व वडिलांची कवच कुंडल तुटतील एवढे आपण कदापी मोठे होत नाही. असे म्हणून त्यांनी आईचे महात्म्य सांगितले. यावेळी धरमशी यांनी स्वामी विवेकानंद, थॉमस एडिसन, शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, आर. डी. बोरा, उद्योजक मुकेश अंबानी, अजिज प्रेमजी, के. एन. जी. रेड्डी, शास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर, डॉ.अवधूत परळीकर, डॉ.किरण मुजुमदार यांच्या नेतृत्वाच्या आणि कार्य करण्याच्या पद्धतीवर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला. या 'पहेला कदम' उपक्रमासाठी अभियांत्रिकी, फार्मसी, एमबीए, एमसीए मधील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यासाठी दोन दिवसात आठ स्वतंत्र बॅच करून कार्यात सकारात्मकता, स्मार्ट वर्क याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य. डॉ. एम.जी. मनियार, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.एस.व्ही.मांडवे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस. मठपती, एफडीपी समन्वयक प्रा. मीनल भोरे, प्रशासन अधिष्ठाता डॉ.आर.आर. गिड्डे, शैक्षणिक अधिष्ठाता व सिव्हील इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.पी.एम.पवार, प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. के.बी. पाटील, पब्लिसिटी अँड प्रोटोकॉल अधिष्ठाता डॉ. डी.एस. चौधरी, ट्रेनिंगचे अधिष्ठाता प्रा. ए.ए. मोटे, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए. पी.केने, रजिस्ट्रार आर.जी. झरकर, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस. बी.भोसले, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.मिनाक्षी पवार, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.स्वाती पवार, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.डी.ए. तंबोळी, प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.एस.ए.लेंडवे, सांस्कृतिक कार्यक्रम विभागप्रमुख डॉ.वाय. एम.खेडकर, वर्कशॉप इन्चार्ज प्रा. बी.डी.गायकवाड यांच्यासह इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व अभियांत्रिकी व फार्मसीच्या चारही महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. डॉ.एन.पी. कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले तर पॉलिटेक्निक इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ डी. मिसाळ यांनी आभार मानले.

कौठाळी येथे अ खेळ पैठणीचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न

गप्पा, गाणी, प्रश्नमंजुषा सह हळदी-कुंकू कार्यक्रमास जोरदार प्रतिसाद

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत धनंजय पाटील यांच्या संकल्पनेतून विठ्ठल प्रतिष्ठान,यांचे वतीने सुप्रसिध्द निवेदिका मोनिका जाजु यांच्या उत्कृष्ट संयोजनातून दैनंदिन जीवनात व्यस्त असलेल्या महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा हेतु सफल झाला. महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा,

त्यांनाही आनंदाचे क्षण वेचता यावेत या अनुषंगाने हा कार्यक्रम कौठाळी, ता. पंढरपूर येथे आयोजित केलेला होता. या कार्यक्रमास कौठाळी व परिसरामधील शेकडो माता-भगिनींनी उस्फुर्त प्रतिसाद देत खेळांमध्ये सहभाग नोंदविला.

यावेळी चेअरमन श्री अभिजीत पाटील यांनी कार्यक्रमादरम्यान महिलांच्या चेहऱ्यावरील हास्य मनाला समाधान देणारे होते अशा भावना व्यक्त करून महिलांना सुखी व आनंदी जीवनाचे मुद्दे पटवून देऊन सदर कार्यक्रमामध्ये विजयी झालेल्या महिलांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांना पारितोषिकांचे वाटप केले. तसेच प्रथमच

सदरचा कार्यक्रम ग्रामीण भागामध्ये आयोजित करून महिलांमध्ये उत्साहाचे वातावर निर्माण केल्याबद्दल चेअरमन श्री अभिजीत पाटील यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी श्री विठ्ठल कारखान्याचे संचालक कालिदास पाटील, राष्ट्रवाद काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे अध्यक्ष ॲड. मोहन पाटील, विठ्ठल पाटील, चंद्रभागा साखर कारखान्याचे माजी संचालक बिभिषण पवार, विठ्ठलचे संचालक समाधान गाजरे, गणेश ननवरे, बाळासाहेब हाके, नवनाथ नाईकनवरे, मा.उपसरपंच नामदेव लेंडवे, महादेव इंगळे, सागर गोडसे, भैय्या पाटील, बाळासाहेब नागटिळक, बाळु इंगळे, शिवाजी नागटिळक, धनंजय भुईटे, सुखदेव नागटिळक, समाधान नागटिळक, तानाजी धुमाळ, बाळासाहेब धुमाळ यांच्यासह अभिजीत पाटील यांच्या मातोश्री जयश्री पाटील, सुमित्रा पाटील, रश्मी पाटील परिवारांसह पंचक्रोशीतील अनेक महिला माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

हत्तीकणबस केंद्रशाळेचे वनभोजन उपक्रम आनंदात यशस्वी

निसर्गाशी मैत्री करा : गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे

अक्कलकोट/प्रतिनिधीः केंद्रशाळा हत्तीकणबसच्या शाळेची क्षेत्रभेट व वनभोजन कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी श्री. प्रशांत आरबाळे यांनी भेट दिली. दरवर्षी प्रगतशील शेतकरी सिद्रामप्पा लिंगाप्पा दोड्याळे यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षक स्टॉफला दरवर्षी दोड्याळे मामांनी स्वखर्चाने जेवणाची व्यवस्था करतात याही वर्षी वनभोजनाचा कार्यक्रम आनंदी वातावरणात पार पडला. यावेळी या नियोजनबद्ध व शिस्तबद्ध वनभोजनास पंचायत समिती अक्कलकोटचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांनी या उपक्रमाचे व दोड्याळे मामा यांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक करून दोड्याळे मामांचे सत्कार करण्यात आले. हे सर्व उपस्थितांनी मिष्ठान्न भोजनाचे आस्वाद घेतला.

या उपक्रमात गटशिक्षणाधिकारी श्री. प्रशांत आरबाळे , केंद्रप्रमुख जीवराज खोबरे, बी. आर. सी. तज्ञ दसरे सर, शा. पो. आ. तज्ञ श्री. गुरव सर, आदर्श उपक्रमशील शिक्षक तुकाराम जाधव सर, श्री. सतीश वाले सर, केंद्रीय मुख्याध्यापक श्री. इस्माईल मुर्डी , श्री. शिवानंद मंगरुळे, सौ. बबिता कोरेकर, सौ. उषा गायकवाड, श्री. राजाराम सुरवसे, श्री. शीतल डावरे, श्री. अरुण पांचाळ, श्री. विक्रम जाधव हे शिक्षक स्टॉफ व गावचे सरपंच श्री. श्रीशैल माळी, श्री.सिद्रामप्पा लिंगाप्पा दोड्याळे प्रगतशील शेतकरी श्री. संजय हिरापुरे, ग्रा. पं. सदस्य श्री. नागेंद्र मेळकुंदे, ग्रा. पं. सदस्य श्री. सैदप्पा निंबाळे माजी अध्यक्ष ड.च.उ. श्रीशैल पाटील, हणमंत बिराजदार, आणप्पा गाडेकर, विरभद्र मेळकुंदे, नितीन दोड्याळे, काशीनाथ पाटील, संजय उण्णद, बसवराज बंदीछोडे, पंडू गाडेकर, डॉ. एन. आर. रोगे समाजसेवक व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी मुलांनी दिवसभर मनोरंजक खेळ गाणी व शेतातील आधुनिक शेती प्रकल्पाची माहिती घेतली. शेवटी केंद्रीय मुख्याध्यापक श्री. इस्माईल मुर्डी यांनी उपस्थितांचे सत्कार करून आभार मानले.

अंबरनाथ येथे एकदिवसीय आंबेडकरी साहित्य संमेलनाचे आयोजन

ठाणे/मिलिंद जाधव : २४ फेब्रुवारी २०२४ शनिवार रोजी अंबरनाथ येथे एकदिवसीय आंबेडकरी साहित्य संमेलन पार पडत आहे. या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे असून संमेलनाचे उदघाटन आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाचे स्वागतध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक बी. अनिल तथा अनिल भालेराव आहेत. यावेळी भव्य संविधान रॅली काढून संमेलनाला सुरुवात होणार आहे.या साहित्य संमेलनात संविधान, मराठी साहित्यातील बहुजनांचे योगदान या विषयांवर परिसंवाद होणार असून सपूर्ण राज्यातून कवी,लेखक आणि रसिक सहभागी होणार आहेत, या संमेलनाला समाजातून उदंड प्रतिसाद मिळत आहे.संमेलन यशस्वी होण्यासाठी शामराव सोमकुवर, धनंजय सुर्वे, सुनील दुपटे, सुधाकर सरवदे परिश्रम घेत आहेत.अधिक माहितीसाठी ९८६०१३३९५० या क्रमांकावर सपर्क साधावा. तर त्या मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

सेवा संस्था आयोजित
आंबेडकरी साहित्य संमेलन

तालुक्यात विविध ठिकाणी अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची कारवाई : तहसिलदार सचिन लंगुटे

पंढरपूर/प्रतिनिधीः अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली असून, तालुक्यातील इसबावी, आंबे तसेच चिंचोली भोसे या ठिकाणी कारवाई करुन अवैध वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे जे.सी.बी, ट्रॅक्टर व डंपिग ट्रॉली व अवैध वाळू जप्त करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध १५ पथकांची नेमणूक केली आहे. मौजे इसबावी हद्दीतील पंढरपूर न.पा पाणी पुरवठा योजना येथे दि. १५ फेब्रुवारी रोजी विनापरवाना वाळू उत्खनन व वाहतुक करताना एक जे.सी.बी. जप्त केला आहे. मौजे आंबे (ता. पंढरपूर) येथे दि. १९ फेब्रुवारी रोजी विनापरवाना केलेला चार ब्रास वाळूसाठा जप्त केला असून, संबधिता विरूध्द पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे. तसेच दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी रोजी पहाटे ५.३० च्या सुमारास चिंचोली भोसे (ता.पंढरपूर) येथून अवैधरित्या वाळु वाहतुक करताना ट्रॅक्टर व डंपिग ट्रॉली पकडण्यात आली आहे. संबधित वाहनांच्या मालकांवर महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्याची कार्यवाही चालू असून, सदर वाहने शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे जमा करण्यात

आली असल्याचे तहसिलदार लंगुटे यांनी कळविले आहे. पथकात अप्पर तहसिलदार तुषार शिंदे, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, मंडल अधिकारी निलेश भंडगे, दिपक शिंदे, विजय शिवशरण, तलाठी प्रमोद खंडागळे, भैरुरतन गोरे, श्रीकांत कदम, समिर पटेल, कोतवाल अनिल सोनवले सहभागी होते

निफाडच्या नगराध्यक्षपदी डॉ. कविता धारराव यांची बिनविरोध निवड

निफाडः निफाड येथील नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा शारदा कापसे यांनी आवर्तन पद्धती नुसार राजीनामा दिल्याने नगराध्यक्ष पद रिक्त झाले होते नगरसेविका डॉ. कविता नितीन धारराव यांनी मुख्याधिकारी अमोल चौधरी यांच्याकडे अर्ज दाखल केला होता, त्यावर उपनगराध्यक्ष अनिल पा कुंदे.सूचक म्हणून तर नगरसेवक किशोर ढेपले.यांनी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केल्या. मुदतीत डॉ. कविता धारराव यांचा एकच अर्ज दाखल झाला असून पिठासिन अधिकारी विशाल नाईकवाडे यांनी त्यांची नगरपंचायत निफाडच्या नगराध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली डॉ. कविता धारराव या पत्रकार स्व.बाळासाहेब कुंभार्डे.यांच्या कन्या आहेत, याप्रसंगी निफाडचे प्रथम नगराध्यक्ष राजाराम शेलार उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, किशोर ढेपले, .साहेबराव बर्डे , अरुंधती पवार,स्वीकृत नगरसेवक संदीप शिंदे ,नगरसेविका शारदा कापसे, विमल जाधव, सुलोचना होळकर, रूपाली रंधवे, कांताबाई कर्डिले, अलका निकम ,सविता तातेड, पल्लवी जंगम ,नगरसेवक सागर कुंदे संदीप जेवुघाले ,जावेद शेख, किरण कापसे ,आदी मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.साहेबराव बर्डे. यांनी कार्यक्रमाचे प्रास्ता

विक केले तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी .राजाभाऊ शेलार.हे होते, शिवाजीराजे ढेपले, शिव सेनेचे चे जिल्हा संपर्क प्रमुख राजेंद्र सोनवणे,संपतराव डुंबरे, ॲड रामनाथ शिंदे.भाजपा च्या डॉ सारिका डेर्ले.आदींनी मनोगत व्यक्त केले असून या प्रसंगी.राजेंद्र मोगल, अशोक पोफळीया, वकील संघाचे अध्यक्ष प्रवीण ठाकरे,डॉ.नितिन धारराव. सुधाकर धारराव.संपत धारराव , शिवाजी धारराव, निफाड सो.सा. संचालक रमेश जाधव.रघुनाथ कुंदे.सचिन धारराव.सुभाष गाजरे, संपत व्यवहारे, तन्वीर राजे,कैलास धारराव, दीपक गाजरे,भाऊसाहेब कापसे, शंकर हिंगमिरे, संजय धारराव,लक्ष्मण निकम, सुभाष कर्डीले, डॉक्टर असोसिएशन चे सर्व डॉक्टर बांधव पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष आण्णासाहेब बोरगुडे व.सर्व विद्यालयाचे मुख्याध्यापक शिक्षक कर्मचारी उपस्थित होते, उपस्थितांचे आभार देवदत्त कापसे यांनी मानले तर सुत्रसंचलन सुहास सुरळीकर यांनी केले ,

निफाड येथे भगवान श्री विश्वकर्मा जयंती साजरी

निफाड : निफाड येथे श्री विश्र्वकर्मा जयंती उत्सव समिती, समाज बांधव, समस्त ग्रामस्थ निफाड यांचे वतीने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भगवान श्री विश्र्वकर्मा जयंती उत्साहात साजरी करण्यात आली ,यावेळी



समाज बांधवांच्या वतीने भगवान श्री विश्र्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन करून सत्यनारायण पुजा करण्यात आली असून महिलांकरता हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी प.पू. जनेश्र्वरा नंदजी महाराज भारत माता आश्रम बोकरदरे यांचे प्रवचन झाले .त्यानंतर महाप्रसादाचा समाज बांधवांनी व नागरिकांनी लाभ घेतला.यावेळी प्रल्हाद दिवेकर, डॉ. सूर्यवंशी ,योगेश जाधव, नितीन दिघे, राजेंद्र मोरे, दत्तात्रय खैरनार, दिलीप क्षीरसागर,

आनंद सूर्यवंशी ,बाळासाहेब पेंढारकर, देविदास भालेराव, किशोर शिंदे, जयंत जैतमाल ,नंदू दिघे, प्रवीण सूर्यवंशी ,विलास भालेराव, दीपक सूर्यवंशी ,नथू मिस्तरी, चंद्रकांत दिघे ,नामदेव पेंढारकर, माणिक भालेराव, ज्ञानेश्र्वर आहेर, विजय सूर्यवंशी, गोरख सोनवणे, आदी समाज बांधवांनी कार्यक्रमाकरिता परिश्रम घेतले.

मातोश्री वृद्धाश्रमातील वृद्धांना दिले ज्येष्ठ नागरिकांच्या कायद्याचे ज्ञान

पंढरपूर/प्रतिनिधीः अनाथ, निराधार, निराश्रित ज्येष्ठ नागरिकांचे जीवन जगणे सुसह्य व्हावे, त्यांना हक्काचा निवारा उपलब्ध व्हावा यासाठी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या किमान समान कार्यक्रमाअंतर्गत व जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांच्या कल्पनेतुन मातोश्री वृद्धाश्रम गोपाळपूर येथे ज्येष्ठनागरिकांना दुरदृष्यप्रणालीव्दारे ऑनलाईन कायदेविषयक शिबीराचे आयोजन न्यायाधीश ए. ए. सोनवलकर, यांच्या अध्यक्षतेखाली कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

दुरदृष्यप्रणालीव्दारे घेण्यात आलेल्या शिबीराच्या प्रमुख पाहुण्या लेखिका श्रीमती म्रुदुल यांनी ज्येष्ठ नागरिकांना तणावपुर्ण जवीन कसे जगायचे याबाबत सांगितले त्यामध्ये अधिक तणावपुर्ण वातावरणामध्ये शरीरावर व वागणुकीवर परिणाम होतो त्यासाठी जास्त तणाव घेऊ नये असेही सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष न्यायाधीश श्री. सोनवलकर यांनी ज्येष्ठ नागरिकांना कायद्याची माहिती दिली. यामध्ये कायद्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या पाल्यांकडून निर्वाह खर्च देण्याची तरतूद आहे, पाल्य म्हणजे ज्येष्ट नागरिक यांच्या रक्त नात्यासंबंधातील मुले व मुली यामध्ये मुलगा, मुलगी, नातू-नात यांचा समावेश होतो, या कायद्यांतर्गत ज्येष्ठांचा सांभाळ न करणाऱ्या पाल्यांना तुरूंगवास, दंड अथवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे, त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आई-वडिलांचा सांभाळ करणे, त्यांच्या सुखसोयीबाबत काळजी घेणे कायद्याने बंधनकारक असल्याचे सांगितले.

सदर शिबीरास पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ड. अर्जुन पाटील यांनी प्रस्तावना केली तर सुत्रसंचालन अधिवक्ता संघाचे सचिव ड. राहुल बोडके केले व कार्यक्रमाचे आभार श्रीमती शितल आसबे यांनी मानले. सदर कार्यक्रमास ॲड.सागर गायकवाड, मातोश्री वृद्धाश्रमाचे श्री धनाजी राक्षे, सिस्टीम ऑफिसर श्री. नईम मोमीण, लिपीक श्री. व्ही. डी. ढोबळे, श्री. विवेक कणकी, श्री. ए. व्ही. अंबुरे तसेच वृद्धाश्रमामधील ज्येष्ठ वृद्ध मोठया संख्येने उपस्थित होते.

परीक्षेत गैरप्रकार टाळण्यासाठी व कॉपी मुक्त परीक्षेसाठी प्रयत्नशील : तहसिलदार सचिन लंगुटे

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी ९ भरारी पथके

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे मार्फत पंढरपूर तालुक्यात दि. २१ फेब्रुवारी ते १९ मार्च २०२४ या कालावधीत एकुण १७ केंद्रांवर उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी) परीक्षा होत आहे. सदर परीक्षेत गैरप्रकार टाळण्यासाठी व कॉपी मुक्त परीक्षेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी ९ पथके स्थापन केली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२वी) परीक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १०वी) परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी परीक्षा केंद्रांना भेटी देण्याकरीता जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या आदेशान्वये उपविभागासाठी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांची भरारी पथक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर पंढरपूर तालुक्यासाठी तहसिलदार सचिन लंगुटे यांना भरारी पथक प्रमुख म्हणून नियुक्त केले आहे. तसेच पंढरपूर तालुक्यातील संवेदनशील परीक्षा केंद्रांना भेटी देण्याकरीता निवासी नायब तहसिलदार मनोज श्रोत्री यांची भरारी पथक प्रमुख नियुक्त केले आहे.

या प्रत्येक पथकामध्ये एक मंडळ अधिकारी, एक महिला तलाठी, व दोन पुरुष तलाठी यांचा समावेश आहे. पंढरपूर तालुक्यातील दोन परीक्षा केंद्र ही संवेदनशील म्हणून घोषीत करण्यात आली आहेत. सदर केंद्रांवर भेट देण्यासाठी भरारी पथक प्रमुख, निवासी नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, यांनी अव्वल कारकून श्रीमती मनिषा अंकुशे (महिला सदस्य), तलाठी समीर पटेल, अमर पाटील यांची नियुक्ती केली आहे.

तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी पंढरपूर यांनी इयत्ता १२ वी चे परीक्षेसाठी पंढरपूर तालुक्यातील सर्व १७ केंद्रांवर, प्रत्येक केंद्रावर ५ कर्मचा-यांचे (महसूल, पोलीस पाटील व पंचायत समिती कार्यालयाकडील कर्मचारी) यांची संयुक्त पथके नियुक्त करण्यात आली आहेत. तर दि. ०१ मार्च पासून होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १०वी) परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी परीक्षा केंद्रांना भेटी देण्याकरीता सुध्दा अशाच पध्दतीने पथके नियुक्त केली आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद,पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखालील या परीक्षा १०० टक्के कॉपीमुक्त करण्याचा तालुका प्रशासनाचा प्रयत्न असल्याचे तहसिलदार लंगुटे यांनी सांगितले.

पंढरपुरात चार ते पाच लाख भाविक दर्शनासाठी वारकऱ्यांनी चंद्रभागा वाळवंटाची केली स्वच्छता

पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटीलः पंढरपूर मध्ये माघी जया एकादशीनिमित्त यात्रेनिमित्ताने चार ते पाच लाख भाविक दर्शनासाठी पंढरपूर मध्ये आले होते व भाविकांनी चंद्रभागा नदीत स्नान केले व यादरम्यान अवशय कर महाराज पाटील वारकऱ्यांनी आज चंद्रभागा वाळवंट आणि नदीपात्राची स्वच्छता केली

पंढरपूर मध्ये आषाढी कार्तिकी एकादशी प्रमाणे माघी एकादशीला देखील यात्रा भरत असते

या यात्रेनिमित्ताने लाखोच्या संख्येने भावी विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपुरात येत असतात या वर्षी देखील जवळपास चार ते पाच लाख माघी यात्रेनिमित्ताने आले होते व चंद्र महा नदीत स्नान करून विठुरायांचे दर्शन घेतले

वारकरी देखील आले होते भाविकांनी संख्या अधिक असल्याने चंद्रभागा नदी व वाळवंट गावात मोठ्या प्रमाणात घाण कचरा झाला होता त्यामुळे आज स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती ३०० पेक्षा जास्त वारकरी सहभागी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीसह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या उपस्थितीत आज सकाळी चंद्रभागा वाळवंट आणि नदीपात्रात स्वच्छता मोहीम राबविण्यात आले आणि स्वच्छता मोहिमेत सुमारे ३०० हून अधिक वारकऱ्यांनी सहभाग सहभागी झाले होते

ईटकूर परिसरात गालफुगीचे थैमान; लहान मुले गालफुगीच्या आजाराने त्रस्त

कळंब/प्रतिनिधि : कळंब तालुक्यातील ईटकुर येथे लहान मुलांमध्ये गालगुंड गालफुगी या आजाराने परिसरात चांगलेच थैमान घातले असून शासकीय आरोग्य केंद्रासह खाजगी दावाखान्यात गालफुगीचे पेशेंट मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळत आहेत.

सर्वसाधारणपणे सहा ते दहा या वयोगटातील मुलांमध्ये पॅरामिक्झोव्हायरस या विषाणुमुळे होणारा आजार आहे. तसेच मुलांमध्ये लाळ ग्रंथींना होणारा विषाणुजन्य आजार आहे. बहुधा दोन्ही गालांना येणारी दुखरी सूज हे त्याचे प्राथमिक लक्षणे आहे. या आजाराला पॅरोटायटीस असेही म्हणतात. गालामधील लाळग्रंथींना पॅरोटिड ग्लैंड असेही म्हणतात. त्याचे मम्स हे नावसुद्धा आहे. या आजाराची योग्यरीत्या वेळीत दखल न घेतल्यास गंभीर परिणामही होऊ शकतात. आजाराचे रुग्ण प्रामुख्याने पावसाळ्यानंतर आढळून येतात. या आजाराचे रुग्ण जुलैनंतर आढळून येतात; तर हिवाळ्यातसुद्धा याचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येतात. सर्दी, खोकला जर मुलांना असेल तर याचे विषाणू हवेतून इतरांच्या शरीरात जाऊन त्यांनाही या आजाराची लागण होण्याची शक्यता असते. हा संसर्गजन्य आजार असल्याने शाळेत जाणाऱ्या लहान मुलांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो. सूज येणे, गाल लाल होणे आदी लक्षणे या आजारात आहेत. त्यामुळे काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

गालगुंड हा एक सहज संसर्ग होणारा विषाणूजन्य आजार आहे. गालगुंड त्वरित पसरतो त्यामुळे गालगुंडचा संसर्ग असल्यास शाळा, नोकरी किंवा इतर कोणत्याही ठिकाणी जाणे टाळावे. चेहऱ्यावर सूज येण्याआधीच रुग्णांना या आजाराची लागण होते. जोपर्यंत चेहऱ्यावर सूज आहे, तोपर्यंत बाहेर जाणे टाळावे.- डॉ तिरुपती मुलगिर वैद्यकीय अधिकारी ईटकर.